# लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी सोशल मिडीयाचा योग्य वापर होणे आवश्यक - जिल्हाधिकारी दौलतराव देसाई

कोल्हापूर, दि.13 मार्च -
भयमुक्त वातावरणामध्ये निवडणुका पार पाडण्यासाठी आणि भारतीयलोकशाही प्रगल्भ करण्यासाठी सोशल मिडीयाचा योग्य वापर होणे आवश्यक आहे.तसेच,कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता सद्सदविवेकबुध्दीने प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावलापाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांनी केले.




शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणिपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवडणूका आणिसोशल मीडिया' या विषयावर सुवर्णमहोत्सवी एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेहोते.  त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी दौलतराव देसाई बोलत होते. मानव्यशास्त्रसभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे होते.

जिल्हाधिकारी दौलतराव देसाई पुढे बोलताना म्हणाले, देशामध्ये साधारण नऊशे दशलक्षमतदार 2019 च्या निवडणुकांमध्ये मतदान करणार आहेत.कोल्हापूर जिल्हयामध्ये साधारणबत्तीस लाख पंचाहत्त हजार मतदार आहेत. यामध्ये आठरा ते एेकोणतीस या तरूण वयोगटामध्येसहा लाख मतदार आहेत.सोशल मिडीयाचा वापर या तरूण नागरिकांमध्ये जास्त प्रमाणातआहे.ग्रामीण आणि शहरी भागातील तरूणांमध्ये सोशल मिडीयाच्या वापरामध्ये फारसा फरकनाही.सोशल मिडीया ही दुधारी तलवार आहे. नागरिक आणि राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्येसोशल मिडीयाचा वापर योग्य प्रकारे झाल्यास देशाची लोकशाही मजबूत होण्यास मदतहोईल.सोशल मिडीया हे अदृश्य हातांनी हाताळले जाते.  यामध्ये प्रत्येक नागरिक हा पत्रकारम्हणून काम करीत असतो.समाजाच्या भल्यासाठी या अदृश्य हातांचा वापर झाला पाहिजे.आज,देशामध्ये सहाशे दशलक्ष मोबाईल इंटरनेट वापरकर्ते आहेत ते दिवसातील दोनशे मिनिटे सोशलमिडीयावर खर्च करीत असतात. या माध्यमांद्वारे कमी वेळेत फार मोठया समुहापर्यंत संदेश पोहचूशकतो.सोशल मिडीयाच्या वापरामध्ये राजकीय पक्षांमध्ये सुसंगती असली पाहिजे. आभासी प्रतिमानिर्माण करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न होवू शकतो.अशा वेळी सोशल मिडीयाचानिवडणूकांमध्ये वापर करताना कोड ऑफ कंडक्टचा योग्य वापर प्रत्येकाने केला पाहिजे.फेकन्युजवर कार्यवाही करण्यासाठी देशपातळीवर आयटी ॲक्टमध्ये दुरूस्ती करण्याचे काम सुरू आहे.सोशल मिडीयावर उमेदवाराची प्रसिध्दी अथवा तिरस्कार करणे अयोग्य ठरेल.मिडीयामॉनिटरींग कक्षाकडून प्रमा

णिकरण करून घेतल्याशिवाय राजकीय पक्षांना, उमेदवारांना सोशलमिडीयावर प्रचार करता येणार नाही.सोशल मिडीयाचा वापर समाजाच्या आणि देशाच्याप्रगतीसाठी होणे आवश्यक आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे म्हणाले,वापरापेक्षा गैरवापराकडेसोशल मिडीयाचा जास्त प्रमाणात वापर होताना दिसत आहे.सोशल मिडीयाच्या वापराबाबतआचारसंहिता आलेली आहे. अशावेळी समाजामध्ये जनजागृती आणि प्रबोधन करणे हे माध्यमांचीकामे आहेत.सोशल मिडीयाच्या वापराबाबत तरूण पिढी आणि सर्वच स्तरांमध्ये संस्कारकरण्याची गरज निर्माण झालेली आहे.समाजामध्ये, देशामध्ये तेढ निर्माण होणार नाही यासाठी मेसेज फॉर्वर्ड करीत असताना नेहमी जागृक असले पाहिजे.इंटरनेट हे सध्या जीवन जगण्यासाठीचेअनिवार्य साधन झालेले आहे.इंटरनेट हे रक्तविरहीत क्रांती आहे, या क्रांतीने माहितीचे स्वातंत्र्यदिले.इंटरनेट, सोशल मिडीया या सारख्या महासागरामध्ये वावरताना संस्कार हेच योग्य होकायंत्रहोवू शकते.विवेक, संवाद, सुसंवाद या त्रिसुत्रीचा उपयोग सोशल मिडयाचा वापर करतानाप्रत्येकान केला पाहिजे.

याप्रसंगी, पद्मश्री सुधाकर ओलवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.विद्यापीठाच्यापत्रकारिता अधिविभागप्रमुख डॉ.निशा पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.सहायकप्राध्यापकडॉ.शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात, सोलापूरविद्यापीठाचे डॉ.रविंद्र चिंचोळकर, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील यांचेसह विविधअधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया प्रमाणातउपस्थित होते.

------



प्रसिध्द छायाचित्रकार पद्मश्री सुधाकरओलवे यांनी मानव्यशास्त्र इमारतसमोरील बागेमध्ये छायाचित्रांचेप्रदर्शन भरवले होते.यावेळी विविधछायाचित्रांची अतिशय सुबक पध्दतीनेझाडांखाली मांडणी करण्यात आलीहोती.समाजातील विदारकता आणिकटुसत्याचे चित्रण पाहण्यासाठीविद्यापीठातील विद्यार्थी, विद्यार्थ्यांचीमोठी गर्दी झाली होती.यावेळीकुलगुरू डॉ.देवानंद शिंदे आणिजिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांनीपद्मश्री ओलवे यांच्या छायाचित्रांची आवर्जुन पाहणी केली.